एकांकिका

# कृष्णविवर

ले. प्रल्हाद जाधव

पात्रे:
तो
आणि
ती

(पडदा उघडतो. गूढ-गंभीर संगीत. हळूहळू  प्रकाश. ‘तो’ आणि ‘ती’ पृथ्वीगोलाच्या पार्श्वभूमीवर पाठीला पाठ लावून उभे. पृथ्वीगोल फिरत असल्याचा भास. मागील पडद्यावर ग्रहताऱ्यांचे भ्रमण. आकाशगंगांचे दर्शन. मधूनच उल्कांचा वर्षाव. सृष्टीनिर्मितीचे वर्णन असणाऱ्या ‘नासदीय सुक्ता’तील काही ओळी (स्वैर मराठी अनुवाद) तो आणि ती यांच्या ओठी–)

तो : खरे खोटे नव्हते काही,
नव्हते आकाश नव्हते पाणी
कुणी कुणावर धरली छाया
कशासाठी ठाव नसलेले पाणी?
ती : मृत्यू नव्हता, अमृत नव्हते
दिवस-रात्रीतील भेदही नाही;
स्पंदन होते वायूशिवाय
अल्याड पल्याडचा भावही नाही!
तो : गोठलेला काळोख होता
भेदातीत पाणी होते
मायेने ग्रासलेले सर्वस्व
‘मूळ-ब्रह्म’ म्हणून साकारले होते!
ती : सत् आणि असत् एकत्र आणत
मनातून निर्माण झाला ‘काम’
तेच आदिम भौतिक मीलन
तोच; बुद्धिगम्य निर्णयाचा अंतिम विश्राम!
तो : या धाग्याने जोडले
जन्म-मृत्यूचे महावस्त्र
एका टोकाला वाढत जाणारे
आणि दुसरीकडून आकसता आकसता
‘शाश्वत’ विस्तारत राहणारे!
ती : कोण जाणणार यातील मर्म?
देवाला तरी माहीत आहे का भविष्य?
पसारा तरी कसे म्हणावे याला?
तथाकथित निर्मात्याला तरी
माहीत असेल, की नसेल?
तो : असेल की नसेल?
ती : आहे की नाही? नाही की आहे?
तो : नक्की काय?
(संगीत)

ती : विचार करून डोकं कामातून जायची वेळ आलीय.

तो : विचार आपल्याला वापरून घेतात–

ती : काळपुरुष आपल्याला एखाद्या अज्ञात कृष्णविवरात कोंडून ठेवतो आणि आपली एनर्जी काढून घेत त्यावर स्वतः जगत राहतो.

तो : कृष्णविवर हा जणू एक फ्रीज आहे आणि त्यातील एनर्जी हवी तेव्हा बाहेर काढून काळपुरुष नवी निर्मिती करत राहतो!

ती : म्हणशील तर मी शरण जाईन,

तो : पण मी हटणार नाही–

ती : पाताळातील खडकावरसुद्धा रूजशील तू!

तो : पण तुझ्या अंगाईने भिजणार नाही.

ती : कोसळू दे सर... सजगतेचे सतत प्रहर–

दोघेही : ऊर्जा आणि कृष्णविवर! ऊर्जा आणि कृष्णविवर!

(ढगांचा गडगडाट विजांचा लखलखाट. वादळ अंधार. स्वच्छ प्रकाश. पृथ्वीगोल नाहीसा झालेला. नवे स्थळ : स्मशान. तो एका थडग्यासमोर उभा. संगीत. हवेच्या झोताबरोबर पालापाचोळा उडत आहे. एकीकडून ती येते.)

तो : तू? तू कशाला आलीस पुन्हा इथं?

ती : (गप्प)

तो : किती वेळा सांगितलं की इथं येऊ नकोस म्हणून?

ती : (गप्प)

तो : तुझे हे बंद थोबाड घेऊन अशीच चालती हो इथनं. नाहीशी हो माझ्या डोळ्यासमोरून.

ती : (हसते)

तो : गेट आऊट !

ती : (अधिक मोठ्याने हसते)

तो : आय सेड, गेट आऊट यू बीच...

ती : अरे पण तू इतका संतापतोस कशाला?

तो : मी तुला चालती व्हायला सागतोय आणि तेही कमालीच्या सभ्य शब्दात.

ती : बीच म्हणजे?

तो : कुत्री... बाजारबसवी!

ती : मला वाटतं हे शब्द सभ्य नाहीत.

तो : तुझ्यासाठी अपवाद आहेत ते कारण तुझ्या सभ्यपणाचं अचूक वर्णन यापेक्षा दुसऱ्या शब्दांनी होऊच शकत नाही.

ती : तुझ्या घाणेरड्या मेंदूतून सभ्य शब्द बाहेर यायला कचरतात हे का सांगत नाहीस?

तो : (निर्वाणीच्या सुरात) मी तुला चालती व्हायला सांगितलंय!

ती : म्हणजे आता धक्के मारून हाकलून देणार!

तो : मी तुला माझ्या स्वत:च्या हातांनी धक्के मारून हाकलून दिलं याचंही समाधान मिळवशील तू.
ती : स्वत:ला कोण समजतोस?
तो : तू महत्त्व देऊ नकोस.
ती : मी महत्त्व देतेय असं का वाटतं तुला?
तो : नाहीतर तू इथं आली असतीस कशाला?
ती : मलाही काही महत्त्व असू शकतं की.
तो : मी तसं मानत नाही.
ती : पण तुझ्या मानण्यावर अवलंबून नाही ते.
तो : तुझं बोलणं विषारी फुत्कारांसारखे आहे.
ती : कारण तुझ्या वर्तनात कौर्य आहे.
तो : तुला काय हवं माझ्याकडून?
ती : तुला माझ्याकडून काही नको का?
तो : इतकी वर्षे बाहेर राहून आल्यानंतर? कुठं होतीस इतकी वर्षे?
ती : ‘कुठं शेण खायला गेली होतीस’ असंच विचाराचंय ना तुला?
तो : बुद्धीची धार अजून कमी झालेली  नाही तुझ्या.
ती : म्हणजे शरीराची रया गेलीय– असंच ना?
तो :स्पष्टच दिसतंय ते!
ती : (हसते)
तो : लज्जा, संकोच हे शब्द कानावरून गेलेत कधी?
ती : नाही.
तो : अशी बाई बाजाराशिवाय दुसरी जाणार कुठं?
ती : तुझ्यासारख्या षंढ  माणसाच्या तोंडी हा संवाद शोभून दिसत नाही.
तो : मी षंढ?
ती : बिनपावसाच्या ढगासारखा, नुसताच गडगडाट!
तो : तुला अखेरचं सांगतो तू निघून जा येथून!
ती : मला ठार माण्याचे विचार येत असतील तुझ्या मनात
तो : तू आधीच मेलेली आहेस. जिवंत आहे तुझी वासना!
ती : (हसते)
तो : ती इतकी चिवट आहे की तिच्यातला थोडासा अंश जरी काढून बाहेर फेकून दिला तरी तिथं क्षणार्धात उगवून येईल वासनेचं एक भलंमोठं झाड. जंगल होईल हळूहळू.
ती : वासना सुंदर असते असं तूच म्हणाला होतास ना?
तो : मृत्यू त्याहीपेक्षा सुंदर असतो, तू मरायला हवं होतंस.
ती : मग तू कशासाठी जगतोस?
तो : तू का मेली नाहीस असं विचारलंय मी?

ती : (लयीत)
तू जिवंत आहेस आणि मी मेले नाही
कारण चेहेऱ्याच्या गुळगुळीत कागदावरती
साक्षात्काराची एकही खूण
अजून  उमटलेली नाही.
तो : (लयीत)
आयुष्याच्या साखळदंडात चेहेरा
जेव्हा आकांत करतो
तेव्हा वाळवंटातला यात्रिक
उंटाच्या सावलीत घड्याळाचं मढं पुरतो.
ती : (लयीत)
ब्रुटसने विश्वासघात केला की
सीझरला मरावं लागतं.
मरणाला वेगळं पाडून
जीवनाला ठेचलं जातं.
तो : (लयीत)
म्हणशील तर मी हसेन
पण तू रडणार नाहीस
ती : (लयीत)
आणि तू हसलास तर मी हसणार नाही.
दोघेही : उरतील फक्त प्रश्न आणि चेहेरे...

(अंधार. ढगांचा गडगडाट. पावसाचा आवाज. काही क्षणांनी प्रकाश. नवे स्थळ : ऑफीस. संध्याकाळ.)

ती : (घड्याळ पहात) बापरे, सहा वाजले! साडेसहाची लोकल पकडायची म्हणजे निघायलाच हवं आता.
तो : (कामात)
ती : निघते मी...तुझं आटपलं की नाही?
तो : आटपलंय पण...
ती : पण काय?
तो : तुझ्याशी थोडं बोलायचं होतं म्हणून मुद्दाम थांबलोय.
ती : (गप्प)
तो : बरेच दिवस बोलीन बोलीन म्हणत होतो पण धीर होत नव्हता.
ती : काय बोलायचं होतं?
तो : म्हणजे नेहमीचं बोलणं नाही ते.

ती : नेहमीचं म्हणजे?

तो : म्हणजे हेच की हवा कशी पडलेय, साखरेचा भाव किती वाढलाय, राजकारणाचे वारे कसे वाहताहेत, दाक्षिणात्य नट्यांनी इकडचं मार्केट कसं काबिज केलंय-

ती : मग?

तो : कदाचित तुला राग येईल, कदाचित तू माझ्याशी बोलणंही बंद करशील–

ती : हे बघ मला गृहित धरू नकोस, जे काय सांगायचय ते स्पष्टपणे सांग. मला साडेसहाची गाडी पडकायचीय.

तो : म्हणजे असं की, आपण एकत्र काम करतो, अनेकदा दोघेच असतो. अशावेळी आपल्या मनात कोणते विचार येत असतील?

ती : आपल्या मनात? काय प्रॉब्लेम काय आहे तुझा?

तो : नाही म्हणजे चेहेऱ्यांवरून काहीच कल्पना येत नाही म्हणून म्हटलं. मनात काय चाललंय हे चेहेऱ्यावरून दिसत नाही हे फारच त्रासदायक वाटतं मला.

ती : कोड्यात बोलतोहेस तू.

तो : कोडं कसलं आलंय त्यात? माझ्याविषयी तुझ्या मनात नक्की काहीतरी येत असलं पाहिजे.

ती : ‘तसलं’ काहीही येत नाही माझ्या मनात.

तो : तसलं म्हणजे?

ती : तसलं म्हणजे तुला जे अभिप्रेत आहे तेच.

ती : म्हणजे, स्त्री-पुरूष संबंधांविषयीच ना!

तो : हो, माझ्या मनात तसला काहीही विचार येत नाही.

तो : प्लीज... खोटं बोलू नकोस.

ती : खोटं?

तो : ट्राय टू अंडरस्टँड मी, शांतपणे विचार करून स्वत:चं असं खरखुरं उत्तर दे.

ती : ‘स्वत:चं असं खरखुरं’ उत्तर?

तो : आपल्या मनाच्या गोडावूनमध्ये रेडीमेड विचारांचा बराच माल पडलेला असतो. जशी मागणी असेल तसा आपण तो बाहेर काढत असतो. पिढ्यान् पिढ्या तीच उत्तरं तेच प्रश्न ! गंमत म्हणजे आपल्याला कधी नवे प्रश्नसुद्धा सुचत नाहीत.

ती : शारीरीक आकर्षण म्हणशील तर तुझ्याविषयी मला ते अजिबात नाही.

तो : तब्बेत तपासून घे तुझी!

ती : माय फूट!

तो : संतापू नकोस. लेट्स मेक इट इझी. तू बुद्धिमान आहेस. सुंदर आहेस. एखाद्या तरूणाशी एकांतात बोलताना त्याच्याविषयी तुला काही आकर्षण वाटणं हे स्वाभाविक आणि सुंदर आहे असं वाटत नाही तुला?

ती : नाही?

तो : तेच म्हणतोय मी. अनैसर्गिक वर्तन करतेयस तू!. टू बी व्हेरी प्रिसायईज– इट्स अ फ्रिजिडीटी... आजार आहे तो एक प्रकारचा!

ती : (उसळत) सी मिष्टर, आय ॲम परफेक्टली ऑलराईट. मलाही शरीर आहे, मन आहे, भावना आहेत, मला पुरूषांचं आकर्षण वाटतं!

तो : देअर यू आर! आपण त्या संबंधीच बोलतोय. पण संतापू नको तू. जी गोष्ट मुळातच आहे ती शांतपणे मान्य करायला काय हरकत आहे?

ती : मला पुरूषांविषयी आकर्षण वाटतं पण मी त्या गोष्टीला अवाजवी महत्त्व देत नाही. शरीराचा विचार न करताही संबंध ठेवता येतात, नाती जोडता येतात...

तो : पण काही विशिष्ट क्षणी फक्त शरीराचाच विचार महत्त्वाचा ठरतो ना?

ती : निघते मी!

तो : तू तुझ्या स्वत:विषयीची एक वेगळीच इमेज  निर्माण करून त्यातच अडकून पडलेली आहेस. तुझा हा चेहेरा—खरा चेहेरा नाही. अनेकदा तुझ्या मनात उचंबळून येणाऱ्या भावना जेव्हा चेहेऱ्याकडे येऊ पाहतात तेव्हा त्यांना वाटेत अडवून दडपून टाकतेस तू!

ती : ओ गॉड! ज्योतिषसुद्धा सांगायला लागलास तू आता.

तो : खोटे आदर्श जपणाऱ्या कादंबरीतील नायिकेसारखी सो कॉल्ड शालीन आणि सोज्ज्वळ असल्याचं भासवू नकोस. तू तुझ्यासारखी जग. तुझ्यासारखी हो. आभाळात ढग आल्यावर मोर नाचायला सुरूवात करतात तितक्या स्वाभाविकपणे स्वत:ला व्यक्त करायला शिक... भावना अनावर झाल्या की जीवलगाच्या बाहुपाशात झोकून द्यायला काय हरकत आहे?

ती : शी  शी  शी! तू इतका विकृत असशील असं वाटलं नव्हतं.

तो : (आक्रमक होत)  मी कधी स्वप्नात आलो नाही तुझ्या?

ती : मला किळस येते तुझी.

तो : मला गच्च मिठी मारून माझं चुंबन घ्यावं असं वाटलं नाही?

ती : आय हेट यू.

तो : फायलीतल्या स्टेटमेंटवर माझा चेहेरा कधी रेखाटला नव्हतास तू?

ती : खोटं!

तो : कॉलेजच्या मॅगझिनमधील तुझी ती कविता माझ्यासाठी नव्हती?

ती : खोटं... साफ खोटं!

तो : ॲक्सिडेंटमध्ये माझ्या डोक्याला मार लागलाय हे समजल्यावर तुझ्या काळजाचा ठोका चुकला नव्हता?

ती : नाही- नाही- नाही!

तो : सत्याच्या दाहकतेमुळे तगमग होतेय तुझी. माझ्या मिठीत ती जलाशयातल्या निळ्या आकाशासारखी प्रशांत होऊन जाईल... ये!

ती : तुला लाज नाही वाटत असं बोलायला?

तो : मग साऱ्या पुरूष जातीची मान खाली जायला हवी.

ती : स्वत:ला पुरूष जातीचा प्रतिनिधी समजण्याचा अधिकार कुणी दिला तुला?

तो : तुझ्याही चेहेऱ्याभवती बिन चेहेऱ्यांच्या कितीतरी बायकांची गर्दी आहे की!

ती : (हसते)

तो : तुझे पाय व्यवस्थेच्या ढिगाऱ्याखाली अडकलेले आहेत. तुला भविष्याचे पंख नाहीत.

ती : स्वत:ला दार्शनिक का मानतोस तू?

तो : मनावरील संस्कारांच्या तथाकथित भुजगांना ठेचून टाकलय मी. माझ्या मनाच्या गोडावूनमध्ये कोणत्याही विचारांचा स्टॉक झालेला नाही, तुझ्यासारखा!

ती : तू ॲबनॉर्मल आहेस.

तो : मी तुझ्यावर बलात्कार केलेला नाही.

ती : (निघते) ओ के, बाऽऽऽय–

तो : जा पण एक लक्षात ठेव की लोकलच्या झाकणाखाली इतकी वाफ कोंडलीय की तुला चुकीच्या स्टेशनात घेऊन जाऊ शकते.

(ढगांचा गडगडाट होतो.)

ती : (खिडकीतून बाहेर पहात) पाऊस पडायला लागला... अंधारून कधी आलं कळलंच नाही. छत्रीही घरी विसरले आज.

तो : (उपरोधाने टाळ्या वाजवत) वा, छत्री विसरली... एकदम सिनेमॅटिक सिच्युएशन. म्हणजे आता आपण दोघं माझ्या छत्रीतून एकत्रच निघायचं. एकमेकांना चिकटून चालायचं, वाटेत चहा घ्यायचा, (उपहासाने) “प्यार हुवा, इकरार हुवा, प्यार से फिर क्यू डरता है दिल...”(हसतो)

तो : ते आकाश पाच मिनिटांपूर्वीचे राहिले नाही.

ती : तू सुद्धा पाच मिनिटांपूर्वीचा राहिला नाहीस?

तो : तो ढगही बदलला आहे!

ती : आकार बदलत राहतात.

तो : कदाचित आताचा त्याचा आकार हाच खरा असेल.

ती : असा निष्कर्ष काढेपर्यंतच त्या आकाशगंगेनं आणखी एखादा आकार धारण केलेला असतो.

तो : एव्हरी शेप इज ट्रूॲन्ड कन्क्लूजन इज इंपॉसीबल.

ती : खरी आकाशगंगा कोणती?

तो : खरी तू कोणती?

ती : खरा तू कोणता?

तो : कोणता-कोणता?

ती : कोणती-कोणती?

(वीज कोसळते. अंधार.सोसाट्याचे वादळ. काही क्षणांनी गुडूप शांतता. पुन्हा प्रकाश. स्थळ : उद्यानातील कोपरा. बसण्याजोगा कठडा. बाजूला एक छोटे अंजिराचे झाड.)

ती : सॉरी

तो : कशाबद्दल?

ती : परवाच्या दिवशी मी जरा तोडूनच बोलले तुला.

तो : मीसुद्धा इतकं एकेरीवर यायला नको होतं.

ती : पण तरीही मी माझं मत बदलेलं नाही, हे विसरू नकोस.

तो : आणि मीही माझ्या मतापासून ढळलेला  नाही, हे लक्षात घे.

ती : तरीही आपण पुन्हा भेटतोय.

तो : पुन्हा पुन्हा भेटत राहावसं वाटतं.

ती : कां?

तो : कशासाठी?

ती : (शांत)

तो : काय झालंय?

ती : डोकं जड झालंय. पायात मुंग्या आल्यासारखं वाटतंय.

तो : असं होतं.

ती : आँ?

तो : महिन्यातील काही विशिष्ट दिवशी हे असं हात-पाय जड होणं, डोकं दुखणं—विशेषत: तरूण स्त्रियांच्या बाबतीत होतं.

ती : ही लक्षणं दुसऱ्या आजाराची सुद्धा असू शकतात.

तो : माझ्याशी खोटं बोलू नकोस. मी तुझं सतत निरीक्षण करतोय. या तारखाना तू बावरलेली दिसतेस. स्वत:त हरवलेली असतेस. रेशमाचा किडा जसा स्वत:भोवती कोष विणतो तसं सावधपणाचं एक संरक्षक कवच तू धारण करत असतेस. चुकीचंय का हे?

ती : इतकं बारीक निरीक्षण कशासाठी करतोस तू माझं?

तो : मी तुझं निरीक्षण करतोय यांच एक सुखद भान तुला असतं म्हणून!

ती : तुला काय हवं माझ्याकडून?

तो : तुला काय हवं माझ्याकडून?

ती : दोघानाही एकच प्रश्न! काना-मात्रा-वेलांटीचाही फरक नाही.

तो : तू सतत माझ्याअवती-भवती राहण्याची दक्षता घेतेस.

ती : तू नाही घेत?

तो : आपण  दोघंही का घेतो?

ती : का घेतो? का?

तो : का? का? का?

ती : तू माझ्या प्रेमात पडलाहेस.

तो : (हसतो)

ती : काय झालं?

तो : मला तुझ्या शरीराचं आकर्षण आहे.

ती : ते प्रेमातूनच निर्माण झालेलं असतं.

तो : प्रेमातून फक्त शोकांतिका निर्माण होते.

ती : भोगाचा शेवटसुद्धा दु:खद असतो.

तो : आपण सर्व पुस्तकातलं बोलतोय. मला कंटाळा आलाय त्याचा. (तिचा हात धरत) चल आपण पलिकडं जाऊ.

ती : ‘पलिकडं’?
तो : पलिकडं म्हणजे एका अज्ञात विश्वात. तिकडं काय आहे हेही माहीत नाही अशा ठिकाणी! कदाचित मागे फिरता येत नाही असं ठिकाण...
ती : मे बी– ब्लॅक होल... कृष्णविवर!
तो : पुन्हा आपण एकमेकांना दिसू याची शाश्वती नाही.
ती : एकमेकांत बघण्यासारखं असतंच काय एवढं?
चेहेरा म्हणजे राखेचा ढिगारा असतो.
त्यात आयुष्याचा संदर्भग्रंथ
जळून खाक झालेला असतो.
तो : व्यंजनाशिवाय स्वर असावा
किंवा सुरांशिवाय बासरी
तसा हा रिक्त चेहेरा
हावभावांचे सावध पवित्रे टाकत राहतो.
ती : तेव्हा त्यात नामशेष होतात संस्कृत्या
साम्राज्यांची पडझड होते
आणि प्रत्येक नव्या मोहाच्या पावलाखाली
नवे बीज अंकुरत रहाते.
तो : पाऊस यायला लागला पुन्हा... ढग फुटून धो धो कोसळायला लागला. बघ... बघ कसा त्याच्या विदग्ध मांड्यांतून कोसळतोय  उत्फुल्ल पाऊस...
(तिला धरून रंगमंचावरून एकीकडून दुसरीकडे चालू लागतो. गडगडाट. विजा लखलखतात. पाऊस... रंगमंचाच्या मधोमध प्रकाशझोतात, पावसात चालत आहेत... चालत आहेत... अंधार होऊ लागतो. अंधारातून मंत्रघोष. पुढील श्लोकाचा घनगंभीर आवाज–)
आवाज :
क्षेत्रभूता स्मृत: नारी,
बीज : भुता स्मृत: पुमान
बीजक्षेत्र समायोगात
संभव: सर्व देहिनाम.
(काही क्षणांनी अर्भकाचे रडणे ऐकू येतो. जणू बाळ जन्माला आले आहे. पार्श्वभूमीवर गारुड्याची पुंगी वाजत आहे. हळूहळू प्रकाश. स्थळ : स्मशान. दोघेही एका थडग्याजवळ उभे)
तो : आय लव्ह यू.
ती : आय लव्ह यू टू.
तो : अट फक्त एकच.
ती : कोणती?
तो : चेहेऱ्यावरचा मुखवटा दूर सारू नको.

ती : तू सुद्धा ती अट पाळायची.
तो : तुझं वय किती?
ती : अंजिराच्या झाडाइतकं. तुझा जन्म कुठं झाला?
तो : नोहाच्या नौकेवर. तुझ्या चेहेऱ्यावरचा हा मखमली पडदा कुठून आणलास?
ती : पँडोराच्या बॉक्समधून.
तो : चल आता आपण चौपाटीवर फिरायला जाऊ.
आईसफ्रूटच्या आतली बांबूची काडी दातांनी कुरतडीत भावी आयुष्याची स्वप्न रंगवू.
ती : माझ्या ओठांच्या कडेला लागलेलं आईस्क्रीम तू तुझ्या रुमालानं हळूवारपणं पुसून काढ.
तो : नंतर आपण हातात हात घालून वाट फुटेल तिकडे चालत राहू.
ती : एक छोटसं घरकुल बांधू.
तो : मी नोकरीवर जाईन.
ती : मी जेवण करीन.
तो : मी एल् आय.सी.ची.पॉलिसी घेईन.
ती : मी बाळाची दुपटी धुवीन.
तो : दोन मुलं झाल्यावर आपण संतती नियमनाची शस्त्रक्रिया करून घेऊ.
ती : मुलं मोठी झाल्यावर आपल्या सुफळ संपूर्ण संसाराचा वारसा त्यांना देऊन आपण गृहस्थाश्रमातून मुक्त होऊ.
(परस्परांचे हात हातात घेतात भारल्यासारखे पाहातात. अंधार. अंधारात पुंगी वाजतच असते. शेवटी पुंगी फुटल्याचा टिपेचा भसाडा आवाज. एकदम स्फोट. शांतता. प्रकाश. स्थळ : पुन्हा प्रारंभीचे. पृथ्वी-गोलार्धाच्या पार्श्वभूमीवर आता ते समोरासमोर तोंड करून उभे. )
तो : इतकी वर्षे कुठं होतीस?
ती : तू एकटाच राहिलास?
तो : कसला सूड उगवलास माझ्यावर?
ती : झोपताना वाचनाची सवय अजूनही आहे तुझी?
तो : तुझा नवरा फार मोठी इस्टेट ठेवून गेला म्हणतात.
ती : तुझा प्रबंध पूर्ण झाला की नाही?
तो : तुला अजून पावसाची भीती वाटते?
ती : अजुनही तू  खिडकीतून सतत चंद्र पाहात राहतोस?
दोघेही : चेहेऱ्यावरून काहीच समजत नाही.
तो : इतकी वर्षे निघून गेली तरी.
ती : माणसाच्या चेहेऱ्यासमोर काळही निष्प्रभ ठरतो.
तो : ढगांचे आकार बदलतात. आकाशगंगा प्रसरण पावत राहतात.
ती : बदल शाश्वत आहे!
तो : आपण आंधळे असतो तर किती बरं झालं असतं.
ती : परस्परांचे चेहेरे आपल्याला दिसले नसते.

तो : (उसळत) तुझ्या वखवखत्या वासनेच्या उथळ दर्शनानं मी आयुष्यभर घायाळ झालो नसतो.
ती : (उसळत) तुझ्या लैंगिक विकृतीचे चाळे बघायचे भोग माझ्याही नशिबी आले नसते.
तो : मी तुला चालती व्हायला सांगितलंय–
ती : कुठं जाऊ मी एकटी?
तो : या प्रश्नांना जिथे अर्थ नाही अशा ठिकाणी!
ती : तुही चल मग!
तो : मी?
ती : तुला यावंच लागेल.
(ती त्याचा हात हातात घेत) ते बघ, ते कृष्णविवर! शोषून घेत आहे आपल्याला. आपण ओढले जातोय त्याच्या आत आत! त्याचे गुरुत्वाकर्षण इतके जबरदस्तआहे की तिथे शेवटी केवळ एक टिंब उरणार आहे आपले! सगळे प्रश्न आपोआप सुटतील. फक्त रूपांतरित होणारी ऊर्जा.चल!

(दोघेही जणू आसमंतात अज्ञाताच्या प्रवासाला निघालेले. तिच्या मागे तो. प्रकाश आणि वाऱ्याचा झोत. मागील पडद्यावर गतीने फिरणारे ग्रहतारे. कोसळणाऱ्या उल्का. वाहणाऱ्या आकाशगंगा... )

दोघेही : खरे खोटे नव्हते काही नव्हते.
आकाश नव्हते, नव्हते पाणी
मृत्यू नव्हता, अमृत नव्हते
दिवस-रात्रीतील भेदही नव्हता
स्पंदन होते वायूशिवाय
अल्याड पल्याड नव्हते काही!
तो : कृष्णविवर हा एक फ्रीज आहे, त्यातील एनर्जी हवी तेव्हा बाहेर काढून काळ पुरुष नवनिर्मिती करत राहतो!
ती : कोसळणारी एक सर
तो : उमलून मिटणारी एक लहर–
दोघेही :
ऊर्जा आणि कृष्णविवर!
ऊर्जा आणि कृष्णविवर!

(विजा चमकतात. वादळ. प्रचंड पाऊस. रंगमंचावर आणि मागील पडद्यावर गतिमान पद्धतीने फिरणारे, खोल खोल गर्तेत घेऊन जाणारे अंधार- प्रकाशाचे भोवरे. संगीत. हळूहळू पडदा.)

***